# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

०६ मार्च, २०२०



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


# दुर्गापुर येथील घरफोडीचा गुन्हा उघड
# एका आरोपीसह गुन्हयातील मुददेमाल हस्तगत

दिनांक ०९/०३/२०२० रोजी फिर्यादी महिला रा. दुर्गापुर यांनी पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे तक्रार दिली की, ते बाहेरगावी गेले असता, कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे घराचे कुलुप आणि आलमारीचे लॉक तोडुन त्यांचे घरातील सोने चांदीचे दागीने, रोख रक्कम आणि इतर साहीत्य असा एकुण ५५,९००/—रू चा मुददेमाल चोरून नेला. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे अप.क्र. ९७/२०२० कलम ४५४,४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच दुर्गापुर येथील तपास पथकाने गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेत तपासास सुरूवात केली. दरम्यान गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम एका दुकानात टिव्ही विक्रीकरीता येणार आहे. यावरून तपास पथकाने सदर ठिकाणी सापाळा रचुन मिळालेल्या माहितीप्रमाणे एका संशयीत इसमास ताब्यात घेवून विचारपुस केली असता त्याचे ताब्यात असलेली टीव्ही ही त्याने दिनांक ०९/०३/२०२० रोजी सदर गुन्हयातील फिर्यादी यांचे घरून चोरी केल्याची कबुली दिल्याने एक टीव्ही किं. १९,०००/—रू चा मुददेमाल हस्तगत करून आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीकडुन गुन्हयातील चोरी केलेला माल हस्तगत करण्यात करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही डॉ.श्री. महेश्वर रेडड्ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन दुर्गापुर पोनि. श्री. खोब्रागडे यांचे नेतृत्वात, पोउपनि. सोनोने, पोहवा. गौरकार, मंजुळकर, पोना. उमेश वाघमारे यांनी पार पाडली.

———————————————————————————————————

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

# बस चालकास मारहाण करणाऱ्या आरोपीस कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन पोंभुर्णा अंतर्गत फिर्यादी सरकारी बस चालकास कर्तव्यावर असतांना मारहाण करणाऱ्या आरोपीस १२/०३/२०२० रोजी **मा. श्री. श्रीधर मौदेकर, सत्र न्यायाधीश क्र. ४ चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

दिनांक ०३/१०/२०१५ रोजी यातील फिर्यादी सरकारी बस चालक नामे उत्तमलाल पारधी वय ४३ रा. डिआरसी क्लब चंद्रपुर हे कर्तव्यावर असतांना बस घेवुन चंद्रपुर ते पोंभुर्णा गेले होते. दरम्यान त्यांनी प्रवाशांना उतरण्यासाठी बस ही पोंभुर्णा बस स्टॉप येथे थांबविली असता. बसच्या मागे उभी असलेली बोलेरो चालक आरोपी नामे अनिल जनार्धन वनकर वय ३० रा. पोंभुर्णा याने तु बस इथे का थांबविली मला मारणार का? असे बोलुन बस चालक फिर्यादी यास बस खाली ओढुन मारहाण केली अशा फिर्यादीच्या आणि मेडिकल रिपोर्टवरून पोलीस स्टेशन पोंभुर्णा येथे अप.क्र. २०/२०१५ कलम ३५३,३३२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा तपासात घेतल्यानंतर तपासी अधिकारी सफौ. श्री. राजु बलगेवार पोलीस स्टेशन पोंभुर्णा यांनी आरोपी नामे अनिल जनार्धन वनकर वय ३० रा. पोंभुर्णा यास अटक करून आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १२/०३/२०२० रोजी **आरोपी नामे अनिल जनार्धन वनकर वय ३० रा. पोंभुर्णा यास कलम ३५३ भादंवि मध्ये ०६ महिने कारावासाची शिक्षा व १,०००/—रू दंड न भरल्यास एक महिना शिक्षा, कलम ३३२ भांदवि मध्ये ०१ वर्ष कारावासाची शिक्षा व २,०००/—रू दंड न भरल्यास ०२ महिने शिक्षा मा. श्री. श्रीधर मौदेकर, सत्र न्यायाधीश क्र. ४ चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. संदीप नागपुरे, सरकारी अभियोक्ता** आणि कोर्ट पैरवी म्हणुन पोहवा. सुधाकर तोडासे, पोलीस स्टेशन पोंभुर्णा यांनी काम पाहिले.

———————————————————————————————————

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


## ट्रकचे टायर चोरी करणारा गडचांदुर पोलीसांच्या जाळयात आरोपीकडुन ६ लक्ष ९५ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक १२/०३/२०२० रोजी फिर्यादी ट्रक चालक नामे कोमल चंदु वाटोरे वय २६ रा. गडचांदुर यांनी पोलीस स्टेशन गडचांदुर येथे रिपोर्ट दिली की, ते रात्रो दरम्यान त्यांचा ट्रक एका चौकात उभा केला असता, एक इसम त्यांचे उभ्या ट्रकचे चाक चोरी करीत असता दिसुन आला. सदर घटनेबाबत फिर्यादीने पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केल्यावरून पोलीस स्टेशन गडचांदुर येथे अप.क्र. १०२/२०२० कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

घटनेची माहिती मिळताच गडचांदुर येथील पोलीस पथकाने घटनास्थळ गाठले. आणि ट्रकचे चाक चोरणाऱ्या आरोपीचा शोधाशोध केला. दरम्यान पोलीस पथकास एक इसम झाडाझुडपात लपुन दिसुन आला. सदर इसमास ताब्यात घेवुन त्याची चौकशी केली असता त्याने सांगीतले की, रात्रो दरम्यान त्याने आपला ट्रक हा फिर्यादीच्या ट्रक च्या बाजुला उभा करून फिर्यादीच्या ट्रकचे ०४ टायर डिक्ससह चोरी केले. अशी कबुली दिल्याने सदर इसम आरोपी नामे शानमोहम्मद उस्मान गणी रा. गडचांदुर यास अटक करण्यात आली. सदर आरोपीस न्यायालयात हजर करून पोलीस कोठडी रिमांड घेवुन आरोपीची कसुन चौकशी केली असता, आरोपीने यापुर्वीसुध्दा गडचांदुर येथुन ०४ टायर डिक्ससह चोरी केल्याची कबुली दिल्याने आरोपीकडुन एकुण ०८ ट्रकचे टायर डिस्कसह किं. १,९५,०००/—रू, आणि आरोपीचा टाटा कंपनीचा ट्रक क्र. एमएच ०४ डीके ७४७७ किं. ५,००,०००/—रू असा एकुंण ६,९५,०००/—रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास गडंचांदुर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही डॉ.श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन गडचांदुर पोनि. श्री. गोपाल भारती यांचे नेतृत्वात सफौ. श्री. सुनिल बोरकर, पोहवा. मनोज नाले, पोशि. विश्वनाथ आणि जगदिश झाडे यांनी पार पाडली.

———————————————————————————————————